संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ही तर संरक्षण आणि सुरक्षिततेशीच तडजोड

**विविध** प्रकारचे संरक्षण साहित्य पुरवणाऱ्या भारतातल्या उत्पादकांना मात्र गेले दोन वर्ष त्यांची थकबाकीदेखील मिळू शकलेली नाही. देशाच्या संरक्षण किंवा सुरक्षिततेसाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही. किंवा त्यासाठी आवश्यक असलेली सर्वसाधारण सामुग्री प्राधान्यक्रमाने खरेदी केली जाईल असे आश्वासन सरकारतर्फे दिले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र वेगळाच अनुभव येत आहे. संरक्षण विभागाला असे विविध साहित्य पुरवणाऱ्या उत्पादकांचे किंवा पुरवठादारांचे थोडेथोडके नव्हे तर तब्बल सोळा हजार कोटींचे देणे केंद्र सरकारने दिलेले नाही. मालाचा पुरवठा केल्यानंतर पुढच्या तीन महिन्यामध्ये त्या बिलांची पूर्तता होणे अपेक्षित असते. मात्र गेल्या दोन वर्षात संरक्षण साहित्य पुरवणाऱ्या पुरवठादारांनी चांगलीच कोंडी झाली आहे. मध्यंतरीच्या काळात सरकारनेच मेक इन इंडियाचा नारा दिला. आणि या योजनेअंतर्गत जे उत्पादक वेगवेगळ्या प्रकारच्या संरक्षण साहित्याचे उत्पादन करू लागले त्यांच्याकडून सरकारने तितक्याच उत्साहात खरेदीही केली. मात्र आता पैसे देण्याची वेळ आल्यानंतर सरकारकडून टाळाटाळ सुरु झालेली दिसते. यासंदर्भात संरक्षण मंत्रालयाकडे संबंधित उत्पादकांनी वारंवार पाठपुरावा करूनही त्यांचे पैसे दिले जात नाहीत. याची कारणे समोर येणे आवश्यक आहे. देशाच्या संरक्षण सिध्दतेला प्राधान्य देण्याच्या नुसत्याच वल्गना करून उपयोगाचे नाही. तर संरक्षण सिध्दतेला आवश्यक सर्व गोष्टींना सरकार प्राधान्य देते. हे कृतीतून दिसले पाहिजे. देशातल्याच संरक्षण साहित्याचे उत्पादन करणाऱ्यांवर होत असलेल्या या अन्यायाबाबत कोणीच बोलताना दिसत नाही. कारण यातून त्यांना कोणतेच राजकीय हेतू साध्य करता येत नाहीत. सोळा हजार कोटी ही काही लहान रक्कम ठरत नाही. खरे तर जर यातील अनेक उत्पादक मेक इन इंडिया या योजनेअंतर्गत संरक्षण साहित्याचे उत्पादन करण्यासाठी पुढाकार घेत असतील तर त्यांना तातडीने प्रोत्साहन दिले पाहिजे.

एक गोष्ट मात्र खरी की संरक्षण साहित्याची खरेदी असो. किंवा त्याचे भारतातील कंपन्यांकडून केले जाणारे उत्पादन असो. एवढेच नव्हे तर भारताच्या विविध बंदरांमध्ये जगाच्या विविध भागातून येणाऱ्या सामुग्रीची पडताळणी असो याबाबतीत अक्षम्य हलगर्जीपणाच होताना दिसतो. देशी उत्पादकांना सरकारकडूनच त्रास दिला जात असताना देशाच्या जवळपास चाळीस बंदरांमध्ये चारशेपेक्षा अधिक कंटेनर अनेक वर्षापासून विनातपासणी तसेच पडून असल्याची धक्कादायक माहितीसुध्दा पुढे आली आहे. महालेखापालांच्या कार्यालयानेच प्रत्यक्ष तपासणी करून यासंदर्भात तीव्र शब्दात हरकतही घेतली आहे. कारण या कंटेनर्समध्ये भंगार असल्याचे सांगितले जात असले तरी अनेक कंटेनर्समध्ये जीवंत बॉंब आणि शक्तीशाली स्फोटके असल्याचा गंभीर गौप्यस्फोटच महालेखापालांच्या अहवालातून झाला आहे. सागरी सुरक्षिततेसाठी बंदरांची सुरक्षितता ही अधिक महत्वाची असते आणि तिथे जर अशा प्रकारच्या स्फोटकांनी भरलेले कंटेनर्स वर्षानुवर्षे तशीच उभी राहात असतील तर इथेसुध्दा आपण आपल्या सुरक्षिततेचा कसा खेळ करीत आहोत हेच स्पष्ट होते. ही सर्व उदाहरणे अत्यंत लाजीरवाणी ठरतात. खरे तर ज्या संरक्षण दलांमध्ये शिस्तीला आणि अनुशासनाला सर्वाधिक महत्व असते. त्याच दलांसाठी केल्या जाणाऱ्या संरक्षण साहित्याच्या खरेदीमध्ये किंवा बंदरांच्या सुरक्षिततेमध्ये अशी बेशिस्त पाहायला मिळत असेल तर तो देखील एक मोठा इशारा ठरतो. यावरून आपणच आपल्या देशाच्या संरक्षण किंवा सुरक्षिततेसाठी अनेक प्रकारच्या तडजोडी करत असल्याचेच स्पष्ट होते.